# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 23/07/2021 (शुक्रवार)
(सकाळ)

---

### चोरी

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 15 कि. मी. अंतरावर श्री अरिहंत रुफिंग कंपनी प्रा. लि. गुमथळा येथे फिर्यादी नामे– रजत अशोककुमार रुईया, वय 30 वर्ष, रा. गुमथळा, ता. कामठी, जि. नागपुर हे श्री अरिहंत रुफिंग कंपनी प्रा. लि. गुमथळा येथे साईड इन्चार्ज या पदावर कार्यरत असून तेथे लोखंडी ऍंगल प्लेटा, चॅनल पि.ई.बी. मटेरियल ठेवलेले होते दि. 15/06/2021 चे 15.00 ते 30/06/2021 चे 23.58 वा. सुमारास 1) लोखंडी प्लेटा नग 124 वनज 1660 कि ग्राम, 2) लोखंडी ऍंगल 324 नग वनज 4047 कि ग्राम 3) लोखंडी चॅनल 90 नग वनज 724 कि ग्राम असा एकुण 6431 कि ग्राम कि 1,60,000/–रु. चा मु मद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री नितीन आगासे मो.क्र. 9130001715 हे करीत आहे.

### जबर दुखापत

1) पो.स्टे. बेला:– अंतर्गत 29 कि.मी अंतरावरील मौजा महालगाव येथे दिनांक 09/07/2021 चे 10.00 वा. ते 14.00 वा. दरम्यान आरोपी नामे– 1) सौ.आचल मंगेश कोकाटे, खाजगी शिक्षीका रा.महालगाव, 2) राजेश चौधरी, वर्ग शिक्षक वर्ग 4 चे रा. उमरेड व 3) पाडुरंग बुचे, मुख्याध्यापक उच्च प्राथमिक शाळा, महालगाव रा. नागपुर यांनी शासनाच्या कोवीड–19 सबंधाच्या आदेशाची अवहेलना करून शिकवनी वर्ग सुरु ठेवून, फिर्यादीची अल्पवयीन मुलगी कु. गाथा कपील मुन वय 9 वर्ष हिला दिलेल्या कृर वागणुकीमुळे तिचे मानसिक व शारीरिक आरोग्य खराब झाले असुन तिला यापुर्वी कधीही नसनारा मानसीक आजार सुरु झाला आहे. तसेच तिचे मानसिक आजारामुळे तिला दैनंदिनी व्यवहार करने अश्यक्य झाले आहे व तिचे जिवीतास धोका निर्माण झाला आहे.

सदर प्रकरणी फियादी नामे– कपील वामन मुन, वय 42 वर्ष, रा.महालगाव. त.भिवापुर जि.नागपुर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बेला येथे आरोपीविरुध्द कलम 352, 325, 506(1), 188, 109 भादंवि. सहकलम 75 बाल न्याय अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री पंकज वाघोडे 7304210724 हे करीत आहे.

2) पो.स्टे. कुही:– अंतर्गत 12 कि.मी अंतरावरील मांढळ येथे दिनांक 19/07/2021 चे 19.00 वा. दरम्यान आरोपी नामे– युवराज नारायण भोयर वय 35 वर्ष, रा मांढळ, ता. कुही जि.नागपुर हा फिर्यादी नामे– सौ मनीषा युवराज भोयर वय 25 वर्ष, रा. मांढळ, ता. कुही, जि.नागपुर हिचा पती असून फिर्यादीने आरोपीला म्हटले की, ''माझा मोबाईल का विकला'' या कारणावरून आरोपीने दारूच्या नशेत गॅस वटयावर ठेवलेले फणस कापन्याच्या धारदार शस्त्राने फिर्यादीच्या डाव्या हातच्या खांदयावर, कोन्हीवर, मनगट, पंज्यावर, डाव्या पायावर, टोगळया खाली, मांडीवर कमरेवर सुदधा धारदार शस्त्राने मारून जखमी केले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम 326 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी श्री अनिल देरकर हे करीत आहे.

## विनयभंग

1) पो.स्टे. सावनेर :– दि. 21/07/2021 चे 09:30 वा. चे सुमारास 43 वर्षीय पिडीत/फिर्यादी हि आपले घरासमोर कचरा टाकण्यास गेली असता आरोपी नामे– मुकेश चंदेलकर, रा. प्रमोद भुरके यांचे घरी किरायाने, स्वराज टाउन पांढुर्णा रोड सावनेर याने फिर्यादीला एकटेच पाहून ईशारा केला यापूर्वा सुध्दा आरोपी हा फिर्यादीस एकटी असल्याचे पाहूण इशारा करीत असतो. यातील आरोपी हा फिर्यादी बाईला वारंवार एकटक पाहूण इशारा करीत असल्याने फिर्यादी बाईचे मनात लज्जा उत्पन्न होइल असे कृत्य केल्याने सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 354 ड भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास परीपोउपनि प्रियंका गेडाम मो.क्र. 9503973657 या करीत आहे.

2) पो.स्टे. सावनेर :– दि. 22/07/2021 चे 17:30 वा. चे सुमारास 15 वर्षीय पिडीत/फिर्यादी अल्पवयीन मुलगी ही आपल्या अंगणात टिव्ही पाहत असतांना आरोपी नामे– विरेन्द्र केशवराव जूमडे, वय 55 वर्ष, रा. नागपूर (आदमने कॉलेजचे प्राचार्य) हे हापपॅन्ट वर आले असून ते दारु पिवून होते. आरोपीचे तोडांला दारुचा वास येत होता त्यांनी फिर्यादीच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 354, 504 भादंवि. सहकलम 8, 12 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि रासकर 9082196080 या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर